The American Center
American Consulate General, Mumbai

PRESS RELEASE

4, New Marine Lines, Mumbai 400 020 Tel: 2262-4590 Fax: 2262-4595 Email:MUMPRESS@STATE.GOV

अमेरिकी व्हिसासाठी लांब रांगा आता इतिहासजमा, व्हिसा मुलाखतीसाठी नवीन तारखांचा लाभ घ्या

मुंबई, ऑक्टोबर २७, २००६, अमेरिकेला जाणाऱ्यांच्या प्रवास प्रकियेला अधिक सुकर करण्यासाठी, अमेरिकी सरकारच्या मुबई-स्थित वाणिज्य दूतावासाने आता व्हिसा-संबंधीच्या मुलाखतींचा वेग वाढवला आहे. वाणिज्य दूतावासाने आपल्या वेळापत्रकात १५,००० हून अधिक व्हिसा-संबंधीच्या मुलाखतींचा समावेश केला आहे व त्यामुळे व्हिसा-अर्जदारांनी ह्या संधीचा लाभ घेऊन व्हिसाच्या मुलाखतीची वेळ सुनिश्चित करावी. आता व्हिसाच्या मुलाखतीसाठी सहा महिने थांबायची गरज नसून अर्ज केल्यानंतर सहा दिवसात व्हिसाच्या मुलाखतीची तारीख मिळू शकते. ह्या सेवेचा लाभ आजपासून या वर्षाअखेरपर्यंत घेता येईल. जर आपण नजीकच्या काळात अमेरिकेला जाण्याचे नेमके योजिले असेल तर लगेच मुबई-स्थित वाणिज्य दूतावासाच्या व्हिसा-संबंधी विस्तारित सेवेचा लाभ घ्यावा. इंटरनेटवर www.vfs-usa.co.in संकेत स्थळावर जाऊन व्हिसाच्या मुलाखतीची वेळ सुनिश्चित करता येईल. जर आधीच मुलाखतीची वेळ मिळाली असेल तर ती विनामूल्य बदलून नजीकच्या काळातील वेळ मागता येईल. मुंबई, अहमदाबाद व पुणेयेथील खाली दिलेल्या व्हिसा फॅसिलिटेशन सेंटरच्या कार्यालयांमध्ये जाऊनदेखील अर्ज भरता येईल. अधिक माहितीसाठी दूरध्वनी ०२२-६६५४७६०० वर संपर्क करा.

१. तिरूपती अपार्टमेट, भुलाभाई देसाई रोड,
महालक्ष्मी मंदिरासमोर, मुंबई --२६
२. गुजरात चेंबर्स बिल्डिग, श्री अंबिका मिल्स,
आश्रम रोड, अहमदाबाद -- ३८०००९
३. १०६, सोहराबहॉल, पहिला मजला,
ससून रोड, पुणे स्टेशन जंक्शन मागे,
पुणे -- ४११००१